राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार .

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१
तक्रार क्र. ११३६ व ११३८/२०१९
(द्वितीय अपील क्र. ६९२ व २७६७/२०१९ मध्ये )

श्री. तांबे नितीन मुधकरराव ,
रा. तांबाराजुरी ता. पाटोदा ,
जि. बीड
: अर्जदार

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक ,
ग्राम पंचायत कार्यालय, तांबाराजुरी
ता. पाटोदा जि. बीड
: उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा ,
विस्तार अधिकारी पंचायत ,
पंचायत समिती , पाटोदा
ता. पाटोदा जि. बीड
: उत्तरवादी क्र.२

राज्य माहिती आयोग

(सुनावणी दिनांक २९.०६.२०२१)

निर्णय

अर्जदार यांनी दि. ८.७.२०१९ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र. ६९२ व २७६७/२०१९ मध्ये आयोगाने दि.९.५.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दोन तक्रारी दाखल केलेल्या आहे सदर तक्रार प्रकरणाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अर्जदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे (नोंदणीकृत टपालाद्वारे) कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व

संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे ई - मेल संदेशाव्दारे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सदर प्रकरणात गुगल मीट ॲपव्दारे सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणीसाठी अर्जदार उपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अर्जदाराने आयोगासमोर कथन केले की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रकरणी आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, आयोगाने द्वितीय अपील क्र. ६९२ व २७६७/२०१९ मध्ये आयोगाने दि.९.५.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्या बाबतचा कोणताही पुरावा आयोगाच्या पटलावर दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, सदरील प्रकरणात अर्जदाराने मागणी केलेली माहिती पंधरा दिवसात अर्जदारास उपलब्ध करुन देतो.

प्रस्तुत प्रकरणात आयोगाने आदेशाव्दारे, संबंधित जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास आवश्यक असलेली माहिती नोंदणीकृत टपालावरे उपलब्ध करुन देणेबाबत आदेशित केलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाचे अनुपालन केले नसल्यामुळे अर्जदार यांनी आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता आयोगातर्फे संधी देण्यात आली. मात्र, आयोगाकडील निर्णयाच्या अनुषंगाने अनुपालन केले असल्याबाबतचा कोणताही पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकलेले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या उल्लंघन करणाऱ्या ठरतात. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा सर्व कृती अनुसरुन अधिनियमातील कलम २० (१) नुसार करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तांबाराजुरी ता. पाटोदा जि. बीड यांना या प्रकरणी रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, वर नमूद केल्याप्रमाणे जबाबदार जन माहिती अधिकारी यांची नावे निश्चित करुन त्यांचेकडुन शास्तीची रक्कम संबंधिताच्या वेतनातुन वसूल करुन ती खालील लेखा शिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) व कलम १९ (७) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

लेखाशिर्ष :- ००७० - इतर प्रशासनिक सेवा

:- ६० - इतर सेवा

:- ८०० - इतर जमा रक्कम

:- १८ - माहिती अधिकार ००७०-००६-१

वर नमूद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली करण्यात आल्यानंतर त्या संदर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी आयोगाकडे सादर करावा.

प्रस्तुत प्रकरणात, अर्जदार यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती आयोगाने आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ही गंभीर बाब आहे. अशा परिस्थितीत आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे निर्णयाचे अनुपालन होईल, ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी व्यक्तिशः पहावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह विचाराधिन दोन तक्रारी निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ल. धारुरकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 383 दि. 24/1/2022

प्रत :- माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१
तक्रार क्र. ११३५/२०१९
( द्वितीय अपील क्र. ६९३/२०१९ मध्ये )

श्री. तांबे नितीन मुधकरराव , : अर्जदार
रा. तांबाराजुरी ता. पाटोदा ,
जि. बीड

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक ,
ग्राम पंचायत कार्यालय, तांबाराजुरी
ता. पाटोदा जि. बीड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा , : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी पंचायत,
पंचायत समिती , पाटोदा
ता. पाटोदा जि. बीड

(सुनावणी दिनांक २९.०६.२०२१)

निर्णय

अर्जदार यांनी दि. ८.७.२०१९ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र. ६९३/२०१९ मध्ये आयोगाने दि.९.५.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रार प्रकरणाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अर्जदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे (नोंदणीकृत टपालाद्वारे) कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे ई - मेल संदेशाव्दारे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सदर प्रकरणात गुगल मीट ॲपव्दारे सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन सुनावणीसाठी अर्जदार उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अर्जदार यांनी आयोगासमोर असे कथन केले की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे कथन केले की, संबंधित अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबधित जनमाहिती अधिकारी व अर्जदार यांनी सुनावणीवेळी माहिती उपलब्ध झाले असल्याचे आयोगासमोर कथन केलेले असल्याने, विचाराधिन तक्रार निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ल. धारुरकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

जावक क्र. 378/5 दि. 24/1/2022

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१
तक्रार क्र. ११३७/२०१९
(द्वितीय अपील क्र. २६८१/२०१९ मध्ये )

श्री. तांबे नितीन मुधकरराव , : अर्जदार
रा. तांबाराजुरी ता. पाटोदा ,
जि. बीड

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय, तांबाराजुरी
ता. पाटोदा जि. बीड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा , : उत्तरवादी क्र.२
शिक्षणधिकारी (माध्यमिक) ,
जिल्हा परिषद, बीड
ता. जि. बीड

**(सुनावणी दिनांक २९.०६.२०२१)**

**निर्णय**

अर्जदार यांनी दि. ८.७.२०१९ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र. २६८१/२०१९ मध्ये आयोगाने दि.९.५.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे सदर तक्रार प्रकरणाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अर्जदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे (नोंदणीकृत टपालाद्वारे) कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे

ई - मेल संदेशाव्दारे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सदर प्रकरणात गुगल मीट ॲपव्दारे सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अर्जदार व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अर्जदाराने आयोगासमोर कथन केले की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रकरणी आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, आयोगाने द्वितीय अपील क्र. २६८१/२०१९ मध्ये आयोगाने दि.९.५.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्या बाबतचा कोणताही पुरावा आयोगाच्या पटलावर दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात आयोगाने आदेशाद्वारे, संबंधित जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास आवश्यक असलेली माहिती नोंदणीकृत टपालावरे उपलब्ध करुन देणेबाबत आदेशित केलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाचे अनुपालन केले नसल्यामुळे अर्जदार यांनी आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता आयोगातर्फे संधी देण्यात आली. मात्र, आयोगाकडील निर्णयाच्या अनुषंगाने अनुपालन केले असल्याबाबतचा कोणताही पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकलेले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या उल्लंघन करणाऱ्या ठरतात. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा सर्व कृती अनुसरुन अधिनियमातील कलम २० (१) नुसार करावयाच्या कारवाईस स्वत:ला पात्र ठरविलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय तांबाराजुरी ता. पाटोदा जि. बीड यांना या प्रकरणी रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, वर नमूद केल्याप्रमाणे जबाबदार जन माहिती अधिकारी यांची नावे निश्चित करुन त्यांचेकडुन शास्तीची रक्कम संबंधिताच्या वेतनातुन वसूल करुन ती खालील लेखा शिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) व कलम १९ (७) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

लेखाशिर्ष :- ००७० - इतर प्रशासनिक सेवा

:- ६० - इतर सेवा

:- ८०० - इतर जमा रक्कम

:- १८ - माहिती अधिकार ००७०-००६-१

वर नमूद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली करण्यात आल्यानंतर त्या संदर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी आयोगाकडे सादर करावा.

प्रस्तुत प्रकरणात, अर्जदार यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती आयोगाने आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ही गंभीर बाब आहे. अशा परिस्थितीत आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे निर्णयाचे अनुपालन होईल, ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी व्यक्तिशः पहावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

उपरोक्त निर्देशासह विचाराधिन तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(दिलीप ल.धारुरकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.-384 दि.-24/1/2022

प्रत :- माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड